**कृपया प्रसिध्दीसाठी** **25 एप्रिल 2009**

## मा. बाळासाहेब ठाकरे यांच्याशी बेईमानी करणा-या संजय निरुपम यांना धडा शिकवा - श्री. उध्दव ठाकरे

**मुंबई, शनिवार :** "कालपर्यंत शिवसेनेत राहून श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादामुळे मानमरातब उपभोगलेल्या श्री. संजय निरुपम यांनी बाळासाहेबांशीच बेईमानी केली आहे, अशा बेईमान श्री. संजय निरुपम यांना धडा शिकवूया." असे आवाहन शिवसेनेचे कार्याध्यक्ष श्री. उध्दव ठाकरे यांनी काल उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातील भाजपा-शिवसेनेचे उमेदवार श्री. राम नाईक यांच्या प्रचारसभेत बोलताना केले.

"स्वार्थाने बरबटलेले श्री. संजय निरुपमांसारखे राजकारणी या देशात उदंड आहेत, जिथे फायदा तिथे वंदा असे यांचे धोरण असते म्हणूनच अशा वातावरणात सातत्याने एकच मतदारसंघ, एकच पक्ष आणि एकच ध्येय धोरण धरुन चालणारे श्री. राम नाईक यांच्यासारखे अपवाद आशेचा किरण आहेत," या शब्दात श्री. नाईक यांचा गौरव करुन श्री. उध्दव ठाकरे पुढे म्हणाले, "महाराष्ट्राची अस्मिता तळपत ठेवण्यामध्ये श्री. राम नाईक यांनी केलेल्या योगदानाची महाराष्ट्राच्या इतिहासात अभिमानाने नोंद केली जाईल. वीर सावरकरांसारख्या स्वातत्र्यवीरांच्या स्मरणार्थ अंदामानच्या कारागृहासमोर अखंड तेवणारी स्वातंत्र्यज्योत श्री. राम नाईक यांनीच करवली. लोकसभेत 'बॉम्बे' चे 'मुंबई' केले. महाराष्ट्राची अस्मिता वृध्दिंगत करणा-या श्री. राम नाईक यांना जनतेने विक्रमी मतांनी निवडून दिले पाहिजे."

भाजपा-महाराष्ट्राचे अध्यक्ष श्री. नितिन गडकरीही या सभेला आवर्जून उपस्थित होते. यावेळी बोलताना श्री. गडकरी म्हणाले, "कॉंग्रेस सरकारचे महाराष्ट्राकडे लक्षच नाही. कृषिमंत्री श्री. शरद पवार महाराष्ट्राचे असूनही महाराष्ट्रात पंधरा हजार शेतकरी आत्महत्या करतात. परंतु शेजारच्याच भाजपाचे राज्य असलेल्या गुजरात मध्ये एकाही शेतक-याच्या मनात असा वेडा-वाकडा विचार येत नाही, याचा अर्थ सूज्ञ मतदाराला समजतो. महाराष्ट्रात कृषि उत्पन्न दर शेकडा अडीच आहे. आणि गुजरात मध्ये हाच दर चार टक्के आहे. गुजरात मधील कापूस उत्पादक शेतक-यांनी कापूस निर्यात 9000 कोटी रुपयांहून 55000 कोटींपर्यत वाढविली. या सर्वांचा अर्थ एकच आहे तो म्हणजे कृषिमंत्री श्री. शरद पवार यांना महाराष्ट्राची फिकीर नाही. " शरद पवार हे कृषिमंत्री नसून क्रिकेटमंत्री आहेत, असा टोला हाणायलाही श्री. नितिन गडकरी विसरले नाहीत.

महागाई आणि रेल्वे समस्या हेच आज उत्तर मुंबईसमोरचे मोठे प्रश्न असून ते निर्माण करणा-या काँग्रेसला मतदार धडा शिकवतील. निवडून आल्यानंतर वाजपेयी सरकारने हाती घेतलेले जे रेल्वे प्रकल्प लालूप्रसाद यांनी रखडविले आहेत त्यांना अग्रक्रमाने पूर्ण करुन देण्याचे वचन यावेळी श्री. राम नाईक यांनी मतदारांना दिले.

मुंबई - भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष व स्थानिक आमदार श्री. गोपाळ शेट्टी यांनी उत्तर मुंबईच्या विकासाची गती वाढविण्याकरिता श्री. राम नाईक यांनाच निवडून देण्याचे आवाहन मतदारांना केले. महापौर श्रीमती शुभा राऊळ, भाजपा-उत्तर मुंबईचे अध्यक्ष श्री. योगेश सागर, शिवसेना विभागप्रमुख श्री. विनोद घोसाळकर, शिवसेना उपनेता श्री. दिलीप नेरुरकर आदी नेत्यांची यावेळी भाषणे झाली. शिवसेना-भाजपा युतीचे उत्तर पश्चिम मतदारसंघाचे उमेदवार श्री. गजानन कीर्तिकर, भाजपा-मुंबईचे उपाध्यक्षद्वय श्री. जयप्रकाश ठाकूर व श्री. रमेश मेढेकर, भाजपा मुंबई महिला अध्यक्ष श्रीमती विंदा कीर्तिकर, प्रभाग समिती अध्यक्षद्वय श्री. भालचंद्र म्हात्रे व श्री शिवकुमार झा तसेच नगरसेवक सर्वश्री मोहन मिठबावकर, प्रविण शहा, प्रकाश कारकर, श्रीमती अपर्णा नार्वेकर आदी नेते मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाजपा-मागाठणे अध्यक्ष श्री. गणेश खणकर यांनी केले तर आभारप्रदर्शन शिवसेना नेते श्री. विजय वालावलकर यांनी केले.

**(विनोद शेलार)**
**प्रसिध्दी प्रमुख**
**भ्रमणध्वनी: 9867689540**